दै. गोदातीर समाचार दि. ०५/१०/२०२२

# शेतात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

## आठ जुगाऱ्यांना अटक; सव्वा पाच लाखांचा मुद्देमाल जप्त



**नायगाव** – बिलोली उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या पथकांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी आठ जुगाऱ्यांना अटक करून सव्वापाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई सोमवारी (दि.३) करण्यात आली.

नायगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वामननगरजवळ एका शेतामध्ये काही व्यक्ती पत्याचा जुगार खेळत आहेत, अशी माहिती सहाय्यक पोलीस अधक्षक अर्चित चांडक यांना मिळाली. यावरून त्यांनी तातडीने कार्यवाही करण्यासाठी नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिषेक शिंदे यांना सुचना दिल्या. यावरून शिंदे यांनी पोउपनि बाचावार, हवालदार वाघमारे, मुस्तापुरे, देगलूरकर, वळगे, गंदपवाड, तमलुरे, अंमलदार देवकते, क्षीरसागर आणि अर्चीत चांडक यांचे चालक पो. उप. नि. झेलेवाड, अंगरक्षक आचेवाड असे पथक तयार करून छापा मारण्याची तयारी करण्यात आली. त्यानंतर चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली जुगार खेळत असलेल्या शेताच्या पुर्व बाजुने पोलीस निरिक्षक शिंदे पो. उप. नि. वाघमारे, पोहेकॉ मुस्तापूरे, देगलूरकर, गंदपवाड, तमलुरे व शेताचे पश्चिम बाजुने पो. उप. नि. बाचावार, पो. कॉ. आचेवाड, क्षिरसागर, देवकते पो. ना. भोळे. असे पायी चालत व शेताचे दक्षिण बाजुने वाहानासह चालक पो. उप. नि. झेलेवाड तसेच पोहेकॉ वळगे, असा सापळा रचुन जुगार खेळणारे ठिकाणी पहाटे दीडच्या सुमारास छापा मारण्यात आला. छाप्यामध्ये आरोपी तीनपत्ती जुगार पैसे लावुन खेळत असताना मिळुन आले. त्यांच्याकडून रोख रक्कम एक लाख ७१ हजार ५०० रूपये व जुगाराचे साहीत्य व सहा मोबाईल, सात दुचाकी जप्त करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

काही आरोंपी अंधाराचा फायदा घेवून अंधारातुन पळुन गेले. ताब्यात घेतलेल्या आरोपीतांमध्ये शेख जावेद सरदार (रा. विठलनगर नायगांव), शिवाजी नागोराव जाधव (रा. कुष्णूर), बालाजी तुळशिराम गुडमलवार (रा. मुखेड), शिवाजी बाबाराव पाटील (रा. मुखेड), पिराजी बालाजी काळमीरे (रा. सालेगांव ता. नायगांव), सोमनाथ रावसाहेब बेलके (रा. नायगांव), हनमंत गोविद बोईनवाड (रा. बेळगेनगर नायगांव), आणि राजेश शिवाजी सुकने (रा. जुने नायगांव) यांचा समावेश आहे.

आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेवून पोलीस ठाण्यांत नायगाव येथे आणुन त्यांच्या विरोध कलम १२ (अ) मु. जू. का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ मुस्तापुरे करत आहेत.

सदर छाप्यामध्ये रोख रक्कम नगदी एक लाख ७१ हजार ५०० रूपये, सहा मोबाईल किमंत अंदाजे ४१ हजार रूपये, सात मोटार सायकल किमंत अंदाजे तीन लाख १२ हजार रूपये असे एकूण ५ पाच लाख २४ हजार ५०० रूपये वा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोदातीर समाचार दि. ०५/१०/२२